दि. १६/१२/२२.

(१) महाराष्ट्र टा. पृ. पान नं. ०१

# वसईचा पूल तीन दिवस बंद

## दुरुस्तीचे कारण; पूर्व-पश्चिमेस जोडणाऱ्या अंबाडी रोडवरील नवीन पुलावर कोंडी

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसईतील अंबाडी मार्गावरील पूर्व-पश्चिमेस जोडणारा रेल्वे उड्डाणपूल दुरुस्तीच्या कामासाठी गुरुवारपासून तीन दिवस बंद ठेवण्यात येत आहे. या पुलाच्या खाली असलेल्या प्लेट कुचकामी झाल्याने त्या बदलण्याचे काम हाती घेण्यात आले असून त्या कामासाठी १५ ते १७ डिसेंबर दरम्यान हा पूल बंद ठेवण्यात येणार असल्याचे पश्चिम रेल्वेने जाहीर केले आहे. त्यामुळे या कालावधीत या पुलाशेजारच्या नव्या पुलावर वाहतुकीचा भार वाढणार आहे. त्यामुळे या परिसरातील वाहतूककोंडीत भर पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



सन २०१८ मध्ये झालेल्या अंधेरी पूल दुर्घटनेनंतर, रेल्वेने सर्व धोकादायक पूल बंद केले होते. या पुलांची पाहणी करून ते दुरुस्त केले जाणार होते. त्यामध्ये वसईच्या अंबाडी रोडवरील पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या जुन्या पुलाचादेखील समावेश होता. हा पूलदेखील बंद करण्यात आला होता. तब्बल दीड वर्षे हा पूल बंद अवस्थेत होता. त्यानंतर केवळ हलक्या वाहनांसाठी हा पूल खुला करण्यात आला होता. मात्र आता डिसेंबर २०२२ मध्ये, पुन्हा एकदा हा पूल दुरुस्तीच्या कामासाठी तीन दिवस बंद ठेवण्यात आला आहे. १५ ते १७ डिसेंबर दरम्यान या पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याचे पश्चिम रेल्वेने जाहीर केले आहे. त्यामुळे या ठिकाणी बॅरीकेड्स लावण्यात आले आहेत. या पुलाच्या खाली असलेल्या १५ ते १६ प्लेट्स निकामी झाल्याने, त्या पूर्णतः बदलून नव्याने बसवण्याचे काम सध्या सुरू आहे. पुलाच्या प्लेट्स या पुलाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे सध्या या प्लेट बदलण्याचे काम सुरू असून पुलावरील वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात आली आहे.

मागील दीड वर्षे हा पूल बंद असताना, नव्या पुलावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत होती. गुरुवारी जुना पूल बंद ठेवल्यानंतर, तशीच परिस्थिती उद्भवली. त्यामुळे केवळ नवीन पुलावरून दोन्ही बाजूंची वाहतूक सुरू राहिल्याने वाहनचालकांना वाहतूककोंडीचा त्रास सहन करावा लागला. करोनानंतर सद्यस्थितीत रस्त्यावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्यानेदेखील वाहतूक कोंडीत भर पडत असल्याचे सांगण्यात येत आहे.

### आणखी दोन दिवस रखडपट्टी

शनिवार १७ डिसेंबरपर्यंत हे काम सुरू राहणार असल्यामुळे जुना पूल बंद राहणार आहे. त्यामुळे आणखी दिवस या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी कोणत्याची शक्यता असून वाहनचालकांनी चिंता व्यक्त केली आहे.

(२) महाराष्ट्र टा. पृ. पान नं. ०१.

# शिक्षणाधिकाऱ्यांविरोधात मनसेचा ठिय्या

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर महापालिकेत मागील दीड वर्षांपासून रिक्त असलेल्या शिक्षणाधिकारी पदावर प्रभारी स्वरूपात अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकारी कार्यालयात गैरहजर राहत असल्याने मनसेकडून शिक्षण विभागात शिक्षणाधिकाऱ्यांविरोधात गुरुवारी ठिय्या आंदोलन करण्यात आले. कार्यालय वातानुकूलित नसल्याने या अधिकारी हजर राहत नाहीत, असे सांगत त्यांना स्वतंत्र वातानुकूलित यंत्रणा असणारे कार्यालय उपलब्ध करून देण्याची उपरोधिक मागणी मनसेने केली.

मिरा-भाईंदरमध्ये पालिकेच्या व खासगी अशा सुमारे २०० हून अधिक शाळा आहेत. मात्र शिक्षणाधिकारी पद दीड वर्षांहून अधिक काळ रिक्त होते. या पदाचा प्रभारी स्वरूपात पदभार सहाय्यक आयुक्त पदाच्या अधिकाऱ्यावर देण्यात आला होता. हे पद रिक्त असल्याने शिक्षण विभागात ठोस निर्णय घेता येत नसल्याचेदेखील बोलले जात होते.



या रिक्त पदाचा अतिरिक्त पदभार मोठ्या प्रतीक्षेनंतर शिक्षण विभागाच्या उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे काही दिवसांपूर्वीच देण्यात आला आहे. मात्र या अधिकारी शिक्षण विभागातील कार्यालय वातानुकूलित नसल्याने, तेथे उपस्थित राहत नसल्याचे मनसेच्या पदाधिकाऱ्यांचे उपरोधिक मत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक कामांमध्ये अडथळा होत आहे. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र कार्यालय व वातानुकूलित यंत्रणा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी मनसेच्या विद्यार्थी सेनेने शिक्षण विभागात गुरुवारी ठिय्या आंदोलन केले. यावेळी एक खुर्ची शिक्षणाधिकाऱ्यांसाठी भेट स्वरूप देण्यात आली.

दि. १६/१२/२२

③ म. २१ पृ. ५/१ नं. ०१

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण

वसई : विरारमध्ये कारवाई करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आल्याची घटना बुधवारी घडली आहे. या प्रकरणी विरार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विरार पूर्वेच्या गोपचर पाडा, मन्सूर नगर, अलसीफा मंजिल येथे वीजचोरी होत असल्याची माहिती महावितरणला मिळाली होती. त्या अनुषंगाने, बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अधिकारी व कर्मचारी कारवाई करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना मारहाण करण्यात आली. गणेश गवसकर, भास्कर चौधरी असे मारहाण झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्याचे नाव आहे. मस्तान उस्मान शेख या व्यक्तीने मारहाण केल्याचे त्यांनी म्हटले.

④ लोकसत्ता पृ. ५/१ नं. ०१

## महामार्गावर वाहनांचे क्रमांक टिपणारे सीसीटीव्ही कॅमेरे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई:** मांडवी पोलिसांनी वाहनांचे क्रमांक टिपणारे उच्च दर्जाचे नऊ सीसीटीव्ही कॅमेरे महामार्गावर लावले आहेत. यामुळे गुन्हेगारांचा माग काढणे सोपे जाणार आहे. टीडीसी बँकेच्या सामाजिक दायित्व निधीतून हे कॅमेरे लावण्यात आले आहे.

पोलिसांनी नागरिकांच्या सहकार्याने शहरात पाच हजारांहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. कॅमेऱ्यातून कितीही वेगाने जाणारे वाहन असेल तरी त्यांचे क्रमांक टिपले जातात. मांडवी पोलिसांनी ठाणे जिल्हा बँकेच्या सहकार्याने कॅमेरे बसवले आहेत. एका कॅमेऱ्याची किंमत ९० हजार एवढी आहेत. पोलिसांना तपास करणे सोपे होणार आहे, अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी दिली.

⑤ लोकसत्ता पृ. ५/१ नं. ०१

## प्रारूप विकास आराखड्यात औद्योगिक क्षेत्र वगळल्यामुळे कारखानदार नाराज

### इमारती उभारून वसाहतधारकांना हद्दपार करण्याचा आरोप

**लोकसत्ता वार्ताहर**

> मीरा-भाईंदर शहरात तीन हजाराहून अधिक औद्योगिक वसाहती असून त्यात दीड लाख कामगार काम करत आहेत. परंतु तरी देखील इतक्या महत्वाच्या वसाहतींची प्रारूप आराखड्यामध्ये नोंद करण्यात आलेली नाही. म्हणून आम्ही या विरोधात हरकती नोंदवल्या असून औद्योगिक वसाहती टिकवण्याचे काम करणार आहोत. **- राजेंद्र मित्तल,** अध्यक्ष, श्री भाईंदर स्टेनलेस स्टील असोसिएशन.

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या प्रारूप विकास आराखड्यात जुन्या औदयोगिक वसाहतीचा उल्लेख नसल्यामुळे येथील कारखानदार नाराज झाले आहेत. तर भविष्यात येथील औद्योगिक वसाहतीच्या जागी मोठ्या इमारती उभारून वसाहतधारकांना हद्दपार करण्याचा कट रचला जात असल्याचे आरोप केले जात आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेचा प्रारूप विकास आराखडा हा २८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. हे काम सहाय्यक संचालक ठाणे नगररचना विभागाकडून करण्यात आले होते.या आराखड्यावर हरकती नोंदवण्यासाठी २८ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली होती.त्यानुसार अखेरच्या दिवसापर्यंत एकूण ३ हजार १०० इतक्या हरकती नोंदवण्यात आल्या.

मात्र अनेक हरकती नोंदवल्यानंतर देखील विकास आखड्यात बऱ्याच त्रुटी असल्याचे समोर येत आहे.त्यामुळे आराखडा रद्द करण्याची मागणी केली जाते. आता त्यात औद्योगिक वसाहत धारकांनी देखील आक्षेप नोंदवल्याचे समोर आले आहे.

शहरात साधारण ४० ते ५० वर्षे जुन्या तीन हजाराहून अधिक औद्योगिक वसाहती आहेत.या वसाहतीची जुन्या विकास आराखड्यात नोंद असल्यामुळे त्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र म्हणून दर्शवण्यात आले होते.

मात्र गेल्या काही वर्षात मीरा भाईंदर शहराचा विकास हा झपाट्याने झाला असून येथे मोठ्या-मोठ्या इमारती उभ्या राहत आहेत.यामुळे आता येथील औद्योगिक वसाहतीची जागा देखील मोठ्या विकासकांच्या घश्यात घालण्यासाठी नव्या विकास आराखड्यात औद्योगिक वसाहती असलेले क्षेत्र रहिवासी क्षेत्र म्हणून दाखवण्यात आले आहे. त्यामुळे या विरोधात सर्व कारखानदार एकवले असून आपला विरोध नोंदवत आहेत.

दि. १६/१२/१२

(૬) સામના પાન નં.૫

# मीरा रोडमध्ये २८ झाडांची कत्तल

## नवघर पोलिसांनी जागेच्या मालकाविरोधात केला गुन्हा दाखल

भाईंदर, दि. १५ (सा.वा.) – मीरा रोड येथील दीपक हॉस्पिटल मार्गावर असलेल्या एका मोकळ्या जागेतील २८ झाडांची बेकायदा कत्तल करण्यात आली आहे. या झाडांचे पुनर्रोपण करण्यासाठी संबंधित जागा मालकाने महापालिकेच्या वृक्षप्राधिकरण समितीची परवानगी घेणे आवश्यक होते. मात्र संबंधित जागा मालकाने कोणतीही परवानगी न घेता या सर्वच झाडांवर कुऱ्हाड चालवली आहे. त्यामुळे नवघर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.



दीपक हॉस्पिटल मार्गावरील आयडियल पार्क गार्डन सिटी इमारतीसमोर असलेल्या मोकळ्या जागेत उंबर, बोर, सुबाभुळ आणि पेट्रो फार्मची २८ झाडे होती. ही जागा नंदकुमार पाटील यांच्या मालकीची आहे. सदर झाडे तोडण्यासाठी किंवा ते दुसऱ्या ठिकाणी हलवण्यासाठी महापालिकेच्या वृक्षप्राधिकरणाची परवानगी आवश्यक होती. मात्र पाटील यांनी अशी कोणतीच परवानगी न घेता सर्व झाडांची कत्तल केली. हा प्रकार महापालिका प्रशासनाला कळल्यानंतर प्रशासनाने पाटील यांना नोटीस पाठवली आणि याबाबत खुलासा करण्यास सांगितले. मात्र पाटील यांनी नोटीस घेण्यास नकार देऊन पालिकेच्या कर्मचाऱ्यांना दमदाटी केली. पाटील यांच्याकडून याप्रकरणी कोणताही खुलासा न आल्यामुळे महापालिकेचे उपमुख्य उद्यान अधीक्षक नागेश विरकर यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी पाटील यांच्या विरोधात महाराष्ट्र वृक्ष संवर्धन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### झाडे तोडणाऱ्यांचे धाबे दणाणले

मीरा-भाईंदर शहरामध्ये तिवराची झाडे मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडून तिथे इमले उभे करण्यात आले आहेत. खाडीकिनारी हे प्रकार सर्रास घडत आहेत. शासकीय जमिनीवरील झाडे हटवून अनेक भूखंड भूमाफियांनी हडप केले आहेत. मात्र आता झाडे तोडल्याप्रकरणी महापालिका प्रशासनाने पोलिसांत गुन्हा दाखल केल्यामुळे झाडे तोडून भूखंड हडपणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. नवघर पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात आरोपीवर काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दि. १५/१२/२२

⑦ लोकमत पु.पान नं.०२

# अल्पवयीन मुलास मारहाण केल्याने गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** दुसऱ्याच्या बुलेटला असलेली चावी पाहून १७ वर्षांच्या तरुणाने ती चालवण्यास नेली तसेच त्याच्या वस्तू काढून घेतल्या म्हणून त्याला पकडून मारहाण करत पालकांकडून पैशांची मागणी करणाऱ्या दोघांवर भाईंदरच्या नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगरमध्ये राहणाऱ्या रखवालदाराचा १७ वर्षांचा मुलगा पूर्वेस काकाकडे चुलत बहिणीच्या वाढदिवसासाठी गेला होता. बुधवारी (दि. १४) मुकुंद कॉम्प्लेक्समध्ये एका बुलेटला चावी लावलेली पाहून ती बुलेट घेऊन तो घरी गेला. नंतर नया नगर भागात बुलेट फिरवली. बुलेटची चेन तुटल्याने चेन तसेच आरसा त्याने काढून ठेवला. हा प्रकार तो ज्यांच्याकडे काम करतो त्या महेंद्र जैन यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी रात्री ९ वाजेच्या सुमारास मुलाला बुलेट मुकुंद कॉम्प्लेक्समध्ये पुन्हा नेऊन ठेवण्यास सांगितली. रात्री तो बुलेट ठेवण्यास गेला असता बुलेटचे मालक राकेश व राजेश गुलाबचंद कुमावत या दोघा भावांनी त्याला पकडून लाकडी बांबू, पट्टा व ठोशाबुक्क्याने मारहाण केली. नंतर कुमावत यांनी मुलाच्या वडिलांना फोन करून, मुलाने बुलेट चोरून नेली व तिच्या वस्तू चोरल्या असल्याने ४० ते ५० हजार रुपये घेऊन ये अन्यथा मुलाला मारून टाकू, असे धमकावले.

मुलाच्या वडिलांनी नवघर पोलिस ठाणे गाठले असता राकेश व राजेश कुमावत पोलिस ठाण्यात हजर झाले. मुलाने बुलेट नेल्याची व चेन तुटल्याने ती व आरसा काढून घेतल्याची कबुली दिली. परंतु अल्पवयीन मुलास बळजबरीने पकडून मारहाण करून त्याला सोडण्यासाठी नुकसानभरपाई म्हणून पैशांची मागणी केल्याने मुलाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून राजेश व राकेश कुमावत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

⑧ पुढारी पान नं.०३

## अमलीपदार्थ, पिस्तूल बाळगणाऱ्याला अटक

**मिरारोड :** अमलीपदार्थ, पिस्तूल बाळगणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. नालासोपारा परिसरात गुन्हे शाखा कक्ष-२ वसई हे पेट्रोलिंग करत असताना अमलीपदार्थ व अवैध गावठी बनावटीचे पिस्तूल आणि कट्टा बाळगणाऱ्या आरोपीला अटक केली आहे.

गुन्हे शाखा २ वसई कक्षाचे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांचे नेतृत्वाखाली गुन्हेगार वॉच पेट्रोलींग करत असताना मोरेगाव नाका, नालासोपारा पूर्व येथे संशईत व्यक्ती राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजु बैल हा पोलीस आल्याचे दिसताच लपत असल्याचे दिसून आले. त्यावेळी गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजू बैल याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ प्लॅस्टीक पिशवीमध्ये दहा लाख रुपये किमतीचा १०० ग्रॅम एम डी (चऊ) हा अंमली पदार्थ तसेच ७१ हजार रुपयांचे एक गावठी बनावटीचे पिस्तूल, एक गावठी कट्टा व ११ जीवंत काडतुसे अशा अवैध हत्यारासहीत मिळुन आल्याने त्याला मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. आरोपीविरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा, भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाण्याचे पथक करत आहे.

दि.१७/१२/२२. पुण्यनगरी पान क्र.०१

# महामोर्चात सामील व्हा!

## राज्यातील जनतेस उद्धव ठाकरे, अजित पवार यांचे आवाहन


छाया : दीपक साळवी

**। मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीमाप्रश्नावर दोन्ही राज्यांनी दावे करून नयेत, न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत समन्वयाची भूमिका घ्यावी, असे सांगितले. यात नवे काय? तसेच सीमावासीयांवर होणाऱ्या अन्यायाचे काय? असे प्रश्न उपस्थित करून शनिवार, १७ रोजी आयोजित केलेल्या मोर्चाला सर्वच महाराष्ट्रप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना (ठाकरे गट)पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत केले.

महामोर्चाच्या आढाव्यासाठी मविआच्या नेत्यांची बैठक गुरुवारी विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या शासकीय निवासस्थानी पार पडली. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांसह मविआतील नेते उपस्थित होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात गेली अनेक वर्ष प्रलंबित आहे. कर्नाटकने बेळगावचे नामांतर करून त्या शहराला मुद्दामहून उपराजधानीचा दर्जा दिला. तेथे ते विधिमंडळाचे अधिवेशन घेऊ लागले आहेत. न्यायप्रविष्ट असतानाच हे सगळे झाले आहे. सीमावासीयांवर कानडी भाषेच्या सक्तीसह अनेक अन्याय होत आहेत. त्याची केंद्राने दखल घेतली नाही ▸▸ पान ७ वर...

## मोर्चाचा अधिकार डावलण्याचा प्रश्नच नाही!



**। मुंबई :** विरोधकांचा मोर्चा, आंदोलने करण्याचा लोकतांत्रिक अधिकार सरकारकडून डावलण्याचा प्रश्नच नाही, मात्र कायदा-सुव्यवस्था आणि अन्य बाबींची काळजी घेऊन स्थानिक पातळीवर प्रशासकीय अधिकारी याबाबत योग्य वेळी योग्य तो निर्णय घेत असतात, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न, महापुरुषांचा अपमान तसेच बेरोजगारी आणि महागाईच्या मुद्द्यांवर मुंबईत महाविकास आघाडीच्या वतीने महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला अद्याप राज्य सरकारकडून परवानगी नाकारण्यात ▸▸ पान ७ वर...

पान क्र.०७

# महामोर्चात सामील व्हा!

(पान १ वरून) आणि आपल्या राज्य सरकारकडूनही ठामपणे काही मांडले गेल्याचे दिसत नाही, अशी टीका करून ते म्हणाले, केंद्रीय गृहमंत्र्यांनी त्यामुळेच राज्यातील विरोधकांचा उल्लेख केला. राज्य सरकारचा हा बोटचेपेपणा महाराष्ट्रप्रेमी कधीही सहन करणार नाहीत.

कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून या काळात जी बेताल वक्तव्ये झाली, त्यामुळे सीमावासीयांवर दहशत पसरवण्यात आली. आता ते ट्विटर हॅक झाले म्हणत असतील, तर हा मूर्ख बनवण्याचा प्रकार आहे. मुख्यमंत्र्यांचा ट्विटर कसा हॅक होतो? आणि त्यांना ते इतक्या उशिरा कसे कळते? तसे खरेच झाले असेल, तर या काळात महाराष्ट्र राज्याची जी हानी आणि बदनामी झाली, त्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी, अशी मागणी ठाकरे यांनी केली.

विरोधी पक्षनेते अजित पवार म्हणाले, महापुरुषांबद्दल सतत बेताल वक्तव्ये करत गरळ ओकण्याचे प्रकार थांबत नसल्याने लोकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून शनिवारचा मोर्चा त्यासाठीच आहे. राजकीय पक्षांव्यतिरिक्त अनेक संस्था, संघटना आणि मान्यवर व्यक्ती त्यात सहभागी होत असल्याने या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. ज्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही; परंतु अस्मिता दुखावली गेली आहे, असेही असंख्य लोक यात सहभागी होणार आहेत. मोर्चा शिस्तबद्ध असला पाहिजे. तिथे कुठेही काहीही विध्वंसक होता कामा नये. गुरुवारी दुपारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विनियोजन बिलासंदर्भात बैठक झाली. त्यावेळी फडणवीस यांना दिल्लीत सीमावादाबाबत झालेल्या बैठकीसंदर्भात विचारले. कर्नाटकची बाजू सर्वोच्च न्यायालयात ॲड. मुकुल रोहतगी मांडणार आहेत, हे समजल्यावर महाराष्ट्राची बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ हरीश साळवे यांची निवड करावी, अशी मागणी करणारे पत्र मी फडणवीस यांच्या हाती दिले. मुख्यमंत्र्यांनाही तसे पत्र दिले, अशी माहिती पवार यांनी दिली.

बैठकीस काँग्रेसचे मुंबईचे अध्यक्ष आमदार भाई जगताप, नसीम खान, माजी मंत्री आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत, आ. सचिन अहिर, माजी मंत्री सुभाष देसाई, जितेंद्र आव्हाड, आ. रईस शेख, माकपचे प्रकाश रेड्डी, भाकपचे मिलिंद रानडे, शेकापचे राजू कोरडे, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय प्रवक्ते क्लाईड क्रॅस्टो, महिला प्रदेशाध्यक्ष विद्याताई चव्हाण आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मोर्चाचा अधिकार डावलण्याचा प्रश्नच नाही

(पान १ वरून) आली नसली तरी देण्यात आलेली नाही, याबाबत प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी लोकशाहीत विरोधकांच्या मोर्चा, आंदोलने करण्याचा लोकतांत्रिक अधिकार सरकारकडून डावलण्याचा प्रश्नच नाही, असे सांगितले. यामुळे या मोर्चाला अटींवर परवानगी दिली जाईल, असा दावा केला जात आहे. दरम्यान, गेल्या सहा महिन्यांत राज्यात महापुरुषांबाबत अपशब्द वापरले जात आहेत. त्यांना कोणी आवरही घालत नाही. याबाबत जनतेत आक्रोश असल्याबाबत विरोधकांकडून मांडण्यात आलेल्या भूमिकेवर मात्र मुख्यमंत्र्यांनी उत्तर देणे टाळले.

दि. १६/१२/२२

(१०) पुण्यनगरी पृ. भाग नं. ०४.

# शंकर नारायण महाविद्यालयात महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेवर व्याख्यान



**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या शंकर नारायण महाविद्यालयात गुरुवारी सकाळी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त व मराठी भाषा विभागाच्या वतीने महिला सक्षमीकरण आणि सुरक्षा या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. खासकरून महिलांची सुरक्षा लक्षात घेऊन नवघर पोलीस ठाणे भाईंदर येथील सपोनि. तेजश्री शिंदे आणि सपोनि. तुकाराम सकुंडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या वेळी महाविद्यालयातील कला व वाणिज्य विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे, कायदा सुव्यवस्थेतील अनेक महत्त्वाच्या बाबींचे स्पष्टीकरण उत्तमरित्या देण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, व विद्यार्थी उपस्थित राहून कार्यक्रम उत्तमरित्या यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमासाठी सुनील धापसे, प्रा. जयेश वैती यांनी विशेष परिश्रम घेतले.